# संदर्भ विभाग

## मराठी संदर्भ ग्रंथ सूची


(१) ओक सुमन - शैक्षणिक तंज्ञविज्ञान
प्रथम आवृत्ती - (श्री विद्या प्रकाशन पुणे, १९९१)

(२) गुरव के.एस. - क्षैक्षणिक कृती संशोधन.
प्रथम आवृत्ती -(मेहता पब्लिशींग हाऊस पुणे, १९९७)

(३) जगताप ह.ना.- शैक्षणिक तंत्रज्ञान.
द्वितीय आवृत्ती -(नूतन प्रकाशन पुणे, १९९१)

(४) जोशी, शिधये - एडस् , समज-गैरसमज
प्रथम आवृत्ती - (लोकवाङमय गृह मुंबई -५)

(५) दांडेकर वा.न. - शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र
(श्री विद्या प्रकाशन पुणे, २००२)

(६) नाडगोंडे गुरुनाथ - सामाजिक संशोधन पद्धती
प्रथम आवृत्ती - (श्री. विद्या प्रकाशन पुणे,१९९१)

(७) पारसनीस हेमलता, देशपांडे लिना- शैक्षणिक कृतीसंशोधन
प्रथम आवृत्ती - (नूतन प्रकाशन पुणे, १९९४)

(८) पेंडसे अच्युत - एडस्ला प्रतिबंध
प्रथम आवृत्ती - (आरोग्य सेवा संचालनायल मुंबई, १९९५)

(९) बापट गो.बा. - मूल्यमापन आणि संख्याशास्त्र
द्वितीय आवृत्ती - (व्हीनस प्रकाशन पुणे, १९७३)

(१०) बापट गो.बा. - शैक्षणिक संशोधन.
तृतीय आवृत्ती - (नूतन प्रकाशन पुणे, १९८८)

(११) मुळे रा.श.उमाठे वि.तु. - शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे
द्वितीय आवृत्ती (नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, १९८७)

(१२) भातलवंडे, गंगाखेडकर - यौवनाच्या उंबरठ्यावर
प्रथम आवृत्ती - (युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड, २००१)

(१३) भिंताडे वि.रा. शैक्षणिक संशोधन पद्धती
(नूतन प्रकाशन पुणे, १९८९)

(१४) य.च.म.मु.वि. वाचा आणि वाचवा
(आरोग्य विद्याशाखा य.च.म.मु.वि. नाशिक, २००३)

(१५) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग - महाराष्ट्र आरोग्य पत्रिका
(महाराष्ट्र राज्य आरोग्य संचालनालय, १९९७)

(१६) साळुंखे सर्जेराव - समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना.
प्रथम आवृत्ती - (नरेंद्र प्रकाशन पुणे, २००२)

## इंग्रजी संदर्भ ग्रंथ सूची


(1) Best, John W. "Research in Education

(Reprint Nwe Delhi Prentic Hall of India Pvt. Ltd., 1963)

(2) Buch M.B. "Third shurey of research in eduoation" (1978-83)

(N.C.E.R.T., 1987)

(3) De, drayn.M. -" AIDS Imagen of Epidemic"

(WHO 19940)

(4) Garrett, H.E. "Statistics in psychology and Education"

(Delhi Common Wealth publisher's, 1988)

(5) NACO, NCERT " AIDS education in school - A training package

(New Delhi - NCERT, 1994)

(6) Nadkarni, Suresh - "HIV and AIDS"

(Popular, Mumbai, 1998)

(7) Nag. Mani - "Sexual Behavlour and AIDS in India

(Vikas, Publishers, Mumbai 1996)

(8) N.C.E.R.T. " Fifth All India educational survey" Vol I.II. (New Delhi - N.C.E..R.T., 1992)

(9) Mane Purmima - "AIDS prevention The Socio cultural contxt in India"

(TISS, Mumbai, 1992)

(10) Rao.D. Bhaskar - "HIV AIDS and Law, Ethics and human rights"

(Discovery Publication house, New Delhi, 2000)

(11) Whithney F.L. Elements of research" (New yark, prentice hall of India., 1954) P.P. 98-112

# परिशिष्टे

## परिशिष्टे

अ) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील उच्च माध्यमिक विद्यालये

आ) संशोधन कार्यवाहीसाठी निवडलेली उच्च माध्यमिक विद्यालये

इ) मा. प्राचार्य / प्राचार्या यांना विनंती पत्र

ई) एड्स विषयक पूर्वज्ञानावर व शास्त्रीय माहितीवर आधारित प्रश्नावली

उ) एड्स विषयक लिखित साहित्य : एडस् एक अनाकलनीय सत्य

ऊ) एड्स जाणीव जागृती संदर्भात मुलाखतीसाठीची प्रश्नावली

ऋ) एड्स विषयक जाणीव जागृती प्रश्नावलीसाठी नमुना उत्तरपत्रिका.

# परिशिष्ट अ

## कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील उच्च माध्यमिक विद्यालये

| उच्च माध्य. विद्यालय | संलग्नता | माध्यम | अनुदान | अध्ययनार्थी | उपलब्ध विद्याशाखा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजाराम कॉलेज | वरिष्ठ | मराठी | शासकीय | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | एमसीव्हीसी |
| के.एम.सी. कॉलेज | वरिष्ठ | मराठी | शासकीय | मुले मुली | कला | वाणिज्य | - | - |
| न्यू कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| शहाजी कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | मुले मुली | कला | वाणिज्य | - | - |
| बी.एम.रोटे कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | मुले मुली | कला | वाणिज्य | - | - |
| शाहू कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| नाईट कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | रात्रशाळा | कला | वाणिज्य | - | - |
| डी.डी.शिंदे कॉलेज | वरिष्ठ | इंग्रजी | अनुदा | मुले मुली | कला | वाणिज्य | - | - |
| विवेकांनद कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | एमसीव्हीसी |
| गोखले कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | एमसीव्हीसी |
| कॉमर्स कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा. | मुले मुली | - | वाणिज्य | - | एमसीव्हीसी |
| कमला कॉलेज | वरिष्ठ | मराठी | अनुदा | फक्त मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| पी.पी.जी. | माध्य | मराठी | अनुदा | फक्त मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| तेंडूलकर | माध्य | मराठी | अनुदा | फक्त मुली | कला | वाणिज्य | - | एमसीव्हीसी |
| म.ल.ग. | माध्य | मराठी | अनुदा | फक्त मुली | कला | - | - | - |
| महाराष्ट्र | माध्य | मराठी | अनुदा | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | एमसीव्हीसी |
| स.म.लोहिया | माध्य | मराठी | अनुदा | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | एमसीव्हीसी |
| मेन राजाराम | माध्य | मराठी | शासकीय | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | एमसीव्हीसी |
| विद्यापीठ | माध्य | मराठी | अनुदा | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| नेहरु | माध्य | मराठी | अनुदा | मुले मुली | कला | - | - | - |
| छ.शिवाजी मराठा | माध्य | मराठी | अनुदा | मुले मुली | कला | वाणिज्य | - | - |
| रा.शाहू | माध्य | मराठी | अनुदा | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| रा.शाहू महाराज | माध्य | इंग्रजी | विनाअनु. | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| न्यू मॉडेल | माध्य | इंग्रजी | विनाअनु | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| डी.वाय.पाटील | स्वतंत्र | इंग्रजी | विनाअनु. | मुले मुली | कला | वाणिज्य | विज्ञान | - |
| शिवाजी तंत्रनिकेतन | माध्य | मराठी | शासकीय | मुले मुली | - | - | - | एमसीव्हीसी |

# परिशिष्ट आ

## संशोधन कार्यवाहीसाठी निवडलेली उच्च माध्यमिक विद्यालये व विद्याशाखा

| अ क्र. | उच्च माध्य विद्यालयाचे नांव | माध्यम | अनुदानप्रकार | अध्ययनार्थी | शाखा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | मेन राजाराम हाय व ज्यु कॉलेज | मराठी | शासकीय | मुले मुली | कला |
| (२) | तात्यासाहेब तेडुलकर ज्यु कॉलेज | मराठी | अनुदानित | फक्त मुली | एमसीव्हीसी |
| (३) | विद्यापीठ हाय व ज्यु कॉलेज | मराठी | अनुदानित | मुले मुली | कला |
| (४) | बी. एम. रोटे ज्यु कॉलेज | मराठी | अनुदानित | मुले मुली | वाणिज्य |
| (५) | विद्यापीठ हाय व ज्यु कॉलेज | मराठी | अनुदानित | मुले मुली | वाणिज्य |
| (६) | नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स | मराठी | अनुदानित | मुले मुली | वाणिज्य |
| (७) | महाराष्ट्र हाय व ज्यु कॉलेज | इंग्रजी | अनुदानित | मुले मुली | विज्ञान |
| (८) | डी. आर. के. कॉमर्स कॉलेज | इंग्रजी | अनुदानित | मुले मुली | एमसीव्हीसी |
| (९) | मेन राजाराम हाय व ज्यु कॉलेज | मराठी | शासकीय | मुले मुली | वाणिज्य |
| (१०) | डी.डी.शिंदे सरकार कॉलेज | इंग्रजी | अनुदानित | मुले मुली | कला |
| (११) | पी.पी.जी. हाय व ज्यु कॉलेज | इंग्रजी | अनुदानित | फक्त मुली | विज्ञान |
| (१२) | मेन राजाराम हाय व ज्यु कॉलेज | इंग्रजी | शासकीय | मुले मुली | विज्ञान |
| (१३) | छत्रपती शिवाजी तंत्रनिकेतन | मराठी | शासकीय | मुले मुली | एमसीव्हीसी |
| (१४) | विद्यापीठ हाय व ज्यु कॉलेज | इंग्रजी | अनुदानित | मुले मुली | विज्ञान |
| (१५) | स.म.लोहीया हाय व ज्यु कॉलेज | मराठी | अनुदानित | मुले मुली | एमसीव्हीसी |
| (१६) | रा.शाहु महाराज ज्यु कॉलेज | इंग्रजी | विनाअनु. | मुले मुली | विज्ञान |
| (१७) | मेन राजाराम हाय व ज्यु कॉलेज | मराठी | शासकीय | मुले मुली | एमसीव्हीसी |
| (१८) | रा.शाहु महाराज ज्यु कॉलेज | इंग्रजी | विनाअनु. | मुले मुली | वाणिज्य |
| (१९) | मलग हाय व ज्यु कॉलेज | मराठी | अनुदानित | फक्त मुली | कला |
| (२०) | रा.शाहु महाराज ज्यु कॉलेज | इंग्रजी | विनाअनु. | मुले मुली | कला |

## परिशिष्ट इ

## मा. प्राचार्य / प्राचार्या यांना विनंती पत्र

शाह देवेंद्र माणिकलाल,
शिक्षणशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
दि.

प्रति,
मा. प्राचार्य / प्राचार्या, ____________

कोल्हापूर.

विषय :- आपल्या उच्च माध्यमिक विद्यालयातील इ. ११वी शाखा कला/वाणिज्य/ विज्ञान/ एम.सी.व्ही.सी. अध्ययनार्थी करीता एडस् विषयी जाणीव जागृती होण्यासाठी लिखित साहित्याची परिणामकारकता तपासण्यासाठी परवानगी मिळणेबाबत.

महोदय / महोदया,

मी शिक्षणशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मधून एम फील करीत असुन प्रा.डॉ. किशोर कुलकर, एस.पी.एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन सांगली. हे मार्गदर्शन करीत आहेत. माझ्या संशोधनाचा विषय उच्च माध्यमिक स्तरावरील इ. ११वी च्या विद्यार्थ्यांमध्ये एडस्विषयी जाणीव जागृती होण्यासाठी लिखित साहित्यनिर्मिती असा आहे.

संशोधनाच्या कार्यवाहीसाठी आपल्या उच्च माध्यमिक विद्यालयातील इ. ११वी शाखा कला/ वाणिज्य/विज्ञान, एम.सी.व्ही.सी. च्या अध्ययनार्थींना एडस्विषयी शास्त्रीय माहिती असणाऱ्या लिखित साहित्यावर आधारित बहुपर्यायी प्रश्नप्रकार असणारी प्रश्नावली दोन टप्प्यामध्ये देऊन भरुन घेण्याचे प्रयोजन आहे. सदर प्रश्नावली देऊन भरुन घेण्यासाठी अध्ययनार्थींना प्रत्येकी एक तास कालावधी लागण्याची अपेक्षा आहे. तरी त्याकामी परवानगी देऊन माझ्या संशोधन कार्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,
तसदीबद्दल क्षमस्व :

आपला विश्वासू,

शाह देवेंद्र माणिकलाल

## परिशिष्ट ई

## ※ एड्सविषयक पूर्वज्ञानावर व शास्त्रीय माहितीवर आधारित प्रश्नावली ※

**संशोधकाचे नांव** : श्री. शाह देवेंद्र माणिकलाल.

**मार्गदर्शकाचे नांव** : प्रा. डॉ. किशोर कुलकर.

**प्रश्नावलीचा हेतू** : एड्सविषयक जाणीव जागृती.

**विद्यार्थ्याचे/विद्यार्थिनीचे नांव** :

**उच्च माध्यमिक विद्यालयाचे नांव** :

इयत्ता ११ वी शाखा कला ☐ वाणिज्य ☐ विज्ञान ☐ एम.सी.व्ही.सी. ☐

सूचना - आपणांस योग्य वाटणाऱ्या पर्यायासमोरील चौकटीत ☑ अशी खूण करावी.

(१) भारतात सर्वप्रथम खालीलपैकी कोणत्या साली एड्सचा रुग्ण आढळून आला?
(अ) १९८१ ☐ (ब) १९८३ ☐ (क) १९८६ ☐

(२) एड्स हा खालीलपैकी कोणत्या प्रकारचा रोग आहे?
(अ) अनुवंशिक ☐ (ब) संसर्गाचा ☐ (क) कुपोषणाचा ☐

(३) एड्स हा रोग खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या रोगजंतूमुळे होतो?
(अ) जीवाणू ☐ (ब) विषाणू ☐ (क) बुरशी ☐

(४) खालीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने एड्सच्या रोगजंतूचा शोध लावला?
(अ) फ्लेमिंग ☐ (ब) पाश्चर ☐ (क) माँटीग्निअर ☐

(५) खालीलपैकी कोणत्या वयोगटातील व्यक्तीमध्ये एड्सचे प्रमाण जास्त दिसून येते?
(अ) १८ ते ४५ ☐ (ब) ०० ते १८ ☐ (क) ४५ च्यापुढील ☐

(६) एच.आय.व्ही. हे एड्स या रोगाचेच टोपण नांव आहे काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(७) एड्स निदान चाचणीशिवाय बाह्यलक्षणांवरून एड्सचे निदान शक्य आहे काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(८) एड्स निदान चाचणीसाठी खालीलपैकी कोणता शरीरस्त्राव तपासला जातो?

(अ) लाळ ☐ (ब) रक्त ☐ (क) मूत्र ☐

(९) एड्स निदान चाचणी दरम्यान एड्सचा रोगजंतू प्रत्यक्षांत दिसतो काय?

(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१०) एड्सच्या निदानासाठी सध्या कोणती चाचणी केली जाते?

(अ) विडाल ☐ (ब) एलायझा ☐ (क) अन्य चाचणी ☐

(११) एड्सचा रोगजंतू खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या रक्तपेशीत वास्तव्यास असतो?

(अ) पांढऱ्या ☐ (ब) तांबड्या ☐ (क) रक्तपट्टीका ☐

(१२) एड्सग्रस्त व्यक्तिंच्या मलमूत्रामध्ये एड्सचे रोगजंतू अस्तित्व दर्शवितात काय?

(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१३) एड्सचा रोगजंतू स्वतंत्रपणे राहू अथवा वाढू शकतो काय?

(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१४) एड्सग्रस्त व्यक्तिशी हस्तांदोलन केल्यामुळे एड्सचा संसर्ग होऊ शकतो काय?

(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१५) सलूनमध्ये सामायिक ब्लेड वापरल्याने एड्स संसर्ग होतो काय?

(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१६) असुरक्षित लैंगिक संबंधांशिवाय अन्य मार्गाने एड्स संसर्ग होऊ शकतो काय?

(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१७) प्रजजन क्षमता प्राप्तीपूर्वीही एड्सचा संसर्ग होऊ शकतो काय?

(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१८) एड्सग्रस्त महिलेकडून तिच्या अर्भकाला एड्सचा संसर्ग होऊ शकतो काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(१९) एड्सग्रस्त मातेकडून स्तनपानाद्वारे एड्स संसर्ग होऊ शकतो काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(२०) लैंगिक संबंधादरम्यान निरोध वापरल्याने एड्स संसर्ग टाळता येतो काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(२१) एड्स झालेल्या स्त्रीने गर्भधारणा होऊ द्यावी काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(२२) डास, माशी, ढेकूण इ. कीटकांद्वारे एड्सचा प्रसार होतो काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(२३) एड्सग्रस्त व्यक्तिने रक्त, वीर्य, अवयव दान करावे काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(२४) एड्सग्रस्त व्यक्तीला इतरांपासून वेगळे ठेवल्याने त्याचा एड्स बरा होतो काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

(२५) उपलब्ध औषधोपचारामुळे एड्सपासून पूर्ण मुक्ती शक्य आहे काय?
(अ) होय ☐ (ब) नाही ☐ (क) माहिती नाही ☐

***

परिशिष्ट उ

# एडस् - एक अनाकलनीय सत्य

जगभरातील वैद्यकीय संशोधकांनी एडस्‌बाधित व्यक्ति रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे विविध प्राणघातक आजारांना बळी पडते असे निष्कर्ष काढले आहेत. अमेरिकेतील लॉस एंजिल्समध्ये १९८१ साली जगातील पहिला तर चेन्नईमध्ये १९८६ साली भारतातील पहिला एडस्‌चा रुग्ण आढळून आला. फ्रेंच शास्त्रज्ञ डॉ. ल्युक मॉटेग्नीअर यांनी १९८३ साली एडसच्या विषाणूचा शोध लावला. फक्त मानवी शरीरातच घातक ठरणाऱ्या एडस्‌च्या विषाणूस एच आय व्ही (Human Immuno Deficiency Virus) असे नांव देण्यात आले. एडस् हे त्याच्या इंग्रजी नावातील शब्दांच्या आद्याक्षरापासून बनलेले संक्षिप्त नांव आहे. ॲक्वायर्ड (Acquired)म्हणजे बाहेरुन आलेला. इम्युनो (Immuno) म्हणजे रोगप्रतिकारशक्ती, डेफीशियन्सी (Deficiency) म्हणजे कमी होणे. तर सिंड्रोम (Syndrome)म्हणजे लक्षणसमुह. अतिशय सुक्ष्म असणारा एडस्‌चा विषाणू जिवंत पेशीबाहेर राहू शकत नसल्यामुळे मानवी रक्तातील टी फोर लिम्फोसाईट (T-4 Lymphocyte) प्रकारच्या रोगप्रतिकारशक्ती निर्माण करणाऱ्या पांढऱ्या रक्तपेशींमध्ये शिरकाव करण्यासाठी मार्ग असल्यामुळे त्यांनाच आश्रयस्थान बनवितो. मानवी शरीरातील प्रत्येक पेशीचे चलनवलन रक्ताच्या माध्यमातून होत असल्याने सर्व अवयव व शरीरस्त्रावामध्ये एच आय व्ही चे अस्तित्व दिसून येते.

एच आय व्ही च्या मानवी शरीरप्रवेशाला एडस् संसर्ग किंवा लागण होणे असे म्हणतात. एच आय व्ही युक्त रक्त घेण्यामुळे रक्त घेणाऱ्या व्यक्तिस एच आय व्ही चा संसर्ग होऊ शकतो. एच आय व्ही बाधित मातेकडून तिच्या पोटी जन्मलेल्या अर्भकाला एच आय व्ही संसर्ग होतो. तर एच आय व्ही बाधित व्यक्तिसाठी वापरलेल्या सुया, सिरिंज इत्यादीचा निर्जंतुकीकरण न करता केलेला वापर निरोगी व्यक्तिमध्ये एच आय व्ही संसर्गास कारणीभूत होऊ शकतो. व्यक्तिच्या जीवनात रक्त चढविणे, इंजेक्शन, लहानमोठ्या शस्त्रक्रियांच्या तुलनेत लैंगिक संबंध अधिक वेळा घडण्याची शक्यता असते. त्यामुळे एच आय व्ही चा संसर्ग प्रामुख्याने लैंगिंक मार्गानेच होत असतो. आपल्या देशात एच आय व्ही संसर्ग

प्रामुख्याने अनेक जोडीदाराबरोबर असुरक्षित लैंगिक संबंधाव्दारे आढळून आला आहे. शिरेतून मादक द्रव्य घेण्यासाठी सामायिक सुई व सिरिंजचा वापर, अविश्वासार्ह रक्तपेढ्यामधून एच आय व्ही साठी रक्तचाचणी न करता दिले घेतलेले रक्त एच आय व्ही संसर्गास कारण ठरु शकते.

मानवी शरीरात प्रवेश केल्यानंतर एच आय व्ही रोगप्रतिकारशक्ती निर्माण करणाऱ्या टी फोर लिम्फोसाईट प्रकारच्या पांढऱ्या रक्तपेशीची यंत्रणा वापरुन स्वत:चे पुनरुत्पादन करुन मूळ पेशीलाच नष्ट करतो. टी फोर लिम्फोसाईटस्ची संख्या प्रमाणापेक्षा कमी झाल्यानंतर एडस्ची लक्षणे दिसण्यास सुरुवात होते. रोगप्रतिकारशक्ती खूप कमी झाल्याने शरीरातील क्षयरोग, नागीण यासारख्या संसर्गजन्य आजारांचे सुप्तावस्थेतील रोगजंतू, वातावरणातील संधीसाधू संसर्गजन्य रोगजंतू शरीरावर नियंत्रण मिळवितात. व्यक्तिच्या मूळ वजनाच्या १० टक्केपेक्षा अधिक वजन घट होते, महिन्यापेक्षा अधिक काळापर्यंत ताप, खोकला तसेच अतिसाराचा त्रास होतो. घश्याला तसेच अन्ननलिकेत पांढरट पिवळसर चट्टे येतात. तथापि आहारनियंत्रण, चिंता-काळजी, उपवास, इतर आजार इत्यादीमुळे एड्ससदृश्य लक्षणे काहीवेळा दिसून येतात. त्यामुळे बाह्यलक्षणावरून एडस्चे निदान करणे शक्य नाही.

सामान्यपणे एच आय व्ही शरीरप्रवेश झाल्यापासून पहिल्या पाच ते आठ वर्षापर्यंत एडस्ची कोणतीही बाह्यलक्षणे दिसून येत नाहीत. कोणत्याही रोगजंतूने शरीरप्रवेश केल्यानंतर त्याला नष्ट करण्यासाठी शरीररोगप्रतिकारयंत्रणा विशिष्ट प्रथिने तयार करते ज्यांना प्रतिद्रव्ये असे म्हणतात. प्रतिदव्याचे शरीरस्त्रावातील अस्तित्व हे रोजगजंतूच्या अस्तीत्वाबाबतचा अप्रत्यक्ष पुरावा असतो. एच आय व्ही चे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी एलायझा (ELISA - Enzyme Linked Immuno Sorbant Assay) किंवा वेस्टर्न ब्लॉट चाचणी (Western Blot Test) या प्रकारच्या अप्रत्यक्ष चाचण्या केल्या जातात. मानवी शरीरस्त्रावापैकी रक्त, वीर्य आणि योनिस्त्रावामध्ये एच आय व्ही चे प्रमाण खुपच जास्त असते, चाचणीसाठी रक्त घेणे सहज शक्य असून एडस्बाधित व्यक्तिच्या फक्त रक्तामध्येच प्रतिद्रव्याचे अस्तित्व समजून येत असल्याने रक्तचाचणी करुन एडस्चे निदान शक्य आहे एच आय व्ही संसर्ग होण्यामध्ये सर्वात वरचा क्रमांक असुरक्षित लैंगिक संबधाचा आहे. त्यामुळे वैवाहिक

जोडीदाराशी लैगिक संबंधाबाबत प्रामाणिक राहणे आवश्यक आहे. विवाहपूर्व किंवा विवाहबाह्य लैगिक संबंधादरम्यान केलेला निरोधचा वापर एच आय व्ही संसर्ग टाळू शकतो. गुप्तरोगामुळे एच आय व्ही संसर्गाची शक्यता अनेक पटीने वाढत असल्यामुळे अशा आजारावर ताबडतोब व योग्य उपचार आवश्यक आहेत. एच आय व्ही युक्त रक्त दिले गेल्याने एडस् संसर्ग होतो त्यामुळे रक्त देण्या घेण्यापूर्वी चाचणी करणे, रक्त देण्या-घेण्यासाठी निर्जतुकीकरण केलेली उपकरणे वापरणे, इंजेक्शन, शस्त्रक्रिया इत्यादीसाठी वापरली जाणारी सुया, सिरींज, शस्त्रास्त्रे इत्यादी निर्जतुकीकरण केलेली किंवा वापरुन नष्ट करण्यायोग्य वापरणे आवश्यक आहे. एच आय व्ही संसर्ग झालेल्या गरोदर स्त्रीकडून तिच्या अर्भकाला होणारा संसर्ग टाळण्यासाठी एकतर गर्भधारणा टाळावी किंवा गर्भधारणा झाली तर गर्भपाताच्या पर्यायाचा विचार करावा.

हस्तांदोलन, अलिंगन, एकत्र बसणे, खेळणे, प्रवास करणे, खाणे-पिणे इत्यादीमुळे एच आय व्ही संसर्ग होत नाही. सार्वजनिक स्वच्छतागृह, पोहण्याचे तलाव यांचा सामायिक उपयोग, एच आय व्ही बाधित व्यक्तिने वापरलेली भांडी, कपडे, टॉवेल, आंथरूण - पांघरुण एच आय व्ही संसर्गास कारणीभूत ठरु शकत नाहीत. तथापि जेथे वापरावयाच्या वस्तूंचा संबंध प्रत्यक्ष रक्ताशी येण्याची शक्यता आहे (उदा. ब्लेड, टूथब्रश, कान/नाक टोचण्यासाठीच्या सुया, गोंदण्यासाठीच्या सुया इ.) तेथे काळजी घेणे आवश्यक आहे. कुत्रा, मांजर इ. प्राणी, डांस, माशी, ढेकूण इ. कीटकांच्या शरीरामध्ये एच आय व्ही जगू अथवा वाढू शकत नाही त्यामुळे मानवेतर सजिव एच आय व्ही संसर्ग करु शकत नाहीत.

एच आय व्ही प्रजननास प्रतिबंध करणारी औषधे उपलब्ध असली तरी उपलब्ध औषधापैकी एकही औषध एच आय व्ही चा समूळ नायनाट करु शकत नाही. एच आय व्ही प्रजननास प्रतिबंध करणारी औषधे रुग्णाचा आज होणारा मृत्यु उद्यापर्यंत लांबवू शकतात.

******

परिशिष्ट ऊ

# ※ एडस् जाणीव जागृती संदर्भात मुलाखतीसाठीची प्रश्नावली ※

(१) गुप्तरोगांचा एडस् या रोगाबरोबर काही संबंध आहे काय ?

(२) डास, माशी, ढेकुण, कुत्रा, मांजर इत्यादीमुळे एच आय व्ही चा प्रसार होतो काय ?

(३) शिरेवाटे मादक द्रव्य घेण्यासाठी सामायिक सुई/सिरींजचा वापर योग्य आहे काय ?

(४) अश्रु, लाळ, घाम इ. शरीरस्त्रावामधून एच आय व्ही संक्रमित होतो काय ?

(५) असुरक्षित लैंगिक संबंधाशिवाय एच आय व्ही संसर्ग होऊ शकतो काय ?

(६) एच आय व्ही संसर्ग रोखण्यासाठी सर्वानीच त्याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे काय ?

(७) विवाहापूर्वी स्त्री-पुरुष दोघानीही एडस्‌बाबत चाचणी करणे आवश्यक आहे काय ?

(८) चाचणी दरम्यान एच आय व्ही संसर्ग झाल्याचे समजले तर काय कराल ?

(९) एच आय व्ही चाचणी सकारात्मक आल्यानंतरही पुन्हा करावी काय ?

(१०) शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या सर्वानीच एच आय व्ही चाचणी केली पाहिजे काय ?

(११) पती किंवा पत्नी दोघांपैकी एकाची एच आय व्ही चाचणी सकारात्मक आली तर त्यांनी काय करावे?

(१२) सकारात्मतक एच आय व्ही चाचणीबाबत गोपनीयता राखणे आवश्यक आहे काय ?

(१३) एच आय व्ही बाधित स्त्रीने गर्भधारणा होऊ द्यावी काय ?

(१४) एच आय व्ही बाधित स्त्रीने बाळाला स्तनपान करावे काय ?

(१५) औद्योगिक संस्थामध्ये नोकरभरतीपूर्वी एच आय व्ही चाचणी करून घ्यावी काय ?

(१६) एच आय व्ही बाधित व्यक्तिला काही सामाजिक हक्क आहेत काय ?

(१७) एच आय व्ही बाधित व्यक्तिची काही कर्तव्ये आहेत काय ?

(१८) एच आय व्ही बाधित व्यक्तिला समाजापासून वेगळे करण्याची गरज आहे काय ?

(१९) एच आय व्ही बाधित व्यक्तिला मृत्यु कश्यामुळे येतो ?

(२०) असुरक्षित लैगिक संबंधाशिवायही एच आय व्ही संसर्ग होऊ शकतो काय ?

(२१) एडस् नियंत्रणासाठी खात्रीशीर औषधोपचार उपलब्ध आहे काय ?

(२२) संपूर्ण रक्त बदलल्याने एडस् बरा होतो काय ?

(२३) एडस् प्रतिबंधासाठी वेश्याव्यवसायावर बंदी घालणे योग्य आहे काय ?

(२४) एच आय व्ही बाधित रुग्णासाठी सरकारी स्तरावर औषधोपचार कोठे केला जातो ?

(२५) एच आय व्ही संसर्ग टाळण्यासाठी जाणीव जागृती कार्यक्रम आवश्यक आहेत काय ?

## परिशिष्ट ऋ

## एडस्‌विषयक जाणीव जागृती प्रश्नावलीसाठी नमुना उत्तरपत्रिका.

(१) भारतात सर्वप्रथम खालीलपैकी कोणत्या साली एडस्‌चा रुग्ण आढळून आला ?

भारतातातील चेन्नई या महानगरामध्ये १९८६ साली सर्वप्रथम एडस्‌चा रुग्ण आढळून आला तर अमेरिकेतील लॉस एंजिल्समध्ये १९८१ साली जगातील पहीला एडस्‌चा रुग्ण आढळून आला.

(२) एडस्‌ हा रोग खालीलपैकी कोणत्या प्रकारचा रोग आहे ?

एडस्‌ हा संसर्गाचा रोग आहे कारण एडस्‌बाधित व्यक्तिशी प्रत्यक्ष शरीरसंबंध अथवा त्याचे रक्त निरोगी व्यक्तिस चढविल्यास, अवयव रोपण केल्यास निरोगी व्यक्तिस एडस्‌ संसर्गीत होतो.

(३) एडस्‌ हा रोग खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या रोगजंतूमळे होतो ?

एडस्‌ हा रोग सुक्ष्मतिसुक्ष्म अश्या आर एन ए प्रकारचे केंद्रकाम्ल असणाऱ्या विषाणूमुळे होतो. एडस्‌चा विषाणू मानवी शरीराशिवाय इतर कोणत्याही सजिवाच्या शरीरात प्राणघातक ठरु शकत नाही.

(४) खालीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने एडस्‌च्या रोगजंतूचा शोध लावला.

फ्रान्सचे शास्त्रज्ञ ल्युक मॉटेंग्नियर यांनी सर्वप्रथम १९८३ साली एडस्‌च्या विषाणूचा शोध लावला तद्‌नंतर अमेरिकेतील शास्त्रज्ञ रॉबर्ट गॅले यांनी १९८४ साली एडस्‌च्या विषाणूचा शोध लावला.

(५) खालीलपैकी कोणत्या वयोगटातील व्यक्तिमध्ये एडस्‌चे प्रमाण जास्त दिसुन येते ?

वय वर्षे ०० ते १८ या वयोगटातील व्यक्तिमध्ये एडस्‌चे प्रमाण जास्त दिसुन येते कारण या वयोगटातील बालकांना मातेकडुन आणि एडस्‌ प्रतिबंधाचे मार्ग माहित नसल्यामुळे एडस्‌चे प्रमाण जास्त दिसुन येते.

(६) एच आय व्ही हे एडस्‌ या रोगाचेच टोपण नांव आहे काय ?

एच आय व्ही हे एडस्‌च्या विषाणूचे नांव असुन ज्यामुळे व्यक्तिची रोगप्रतिकारक शक्ति अतिशय कमी झाल्याने त्यास संधीसाधू प्राणघातक आजारांची लागण होते अश्या स्थितीत एडस्‌ झाला असे म्हणतात.

(७) एडस्‌ निदान चाचणीशिवाय बाह्यलक्षणावरुन एड्स्‌चे निदान शक्य आहे काय ?

बाह्यलक्षणावरुन एडस्‌चे निदान करणे कदापिशक्य नाही कारण एडस्‌च्या प्रगत अवस्थेमध्ये दिसणारी सर्वच लक्षणे इतर आजारमध्ये दिसतात त्यामुळे बाह्यलक्षणावरुन एडस्‌ निदान शक्य नाही.

(८) एडस्‌निदान चाचणीसाठी खालीलपैकी कोणता शरीरस्त्राव तपासला जातो ?

एडस्‌चा विषाणू रक्तातील टी फोर लिम्पोसाईटस्‌ या पांढऱ्या रक्त पेशीमध्ये वास्तव्यास असतो. त्यामुळे एडस्‌निदान चाचणीदरम्यान विषाणूचे अप्रत्यक्ष अस्तित्व पाहण्यासाठी रक्त तपासणी केली जाते.

(९) एडस्‌निदान चाचणी दरम्यान एडस्‌चा रोगजंतू प्रत्यक्षात दिसतो काय ?

एडस्‌निदान करीता केल्याजाणाऱ्या अप्रत्यक्ष चाचणीमध्ये एडस्‌च्या विषाणूचे अस्तित्व दिसुन येत नाही, परंतु त्यांनी तयार केलेल्या प्रतिद्रव्यचे अस्तित्व समजून येते.

(१०) एडस्‌च्या निदानासाठी सध्या कोणती चाचणी केली जाते. ?

एडस्‌च्या निदानासाठी सध्या एलायझा (Enzyme Linked Immuno Sorbant Assay) नावाची चाचणी केली जाते त्याचबरोबर समकक्ष अशी वेस्टर्न ब्लॉट चाचणीही केली जाते.

(११) एडस्‌चा रोगजंतू खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या रक्तपेशीत वास्तव्यास असतो ?

एडस्‌च्या रोगजंतू टी फोर लिम्कोसाईटस्‌ नावाच्या पांढऱ्या रक्तपेशीमध्ये वास्तव्यास असतो. कारण या पेशीमध्ये प्रवेश करण्यासाठी काही दरवाजे खुले असतात जे इतर शरीरपेशीमध्ये दिसुन येत नाहीत.

(१२) एडस्‌ग्रस्त व्यक्तिच्या मलमुत्रामुध्ये एडस्‌चे रोगजंतू अस्तित्व दर्शवितात काय ?

एडस्‌ग्रस्त व्यक्तिच्या मलमुत्रामध्ये एडस्‌चे रोगजंतू अस्तित्व दर्शवित नाहीत. कारण एडस्‌चा विषाणू रक्तातील टी फोर लिम्फोसाईटस्‌ शिवाय इतरत्र राहू शकत नाही.

(१३) एडस्‌चा रोगजंतू स्वतंत्रपणे राहु अथवा वाढू शकतो काय ?

एडस्‌चा रोगजंतु स्वतंत्रपणे राहु अथवा वाढू शकत नाही. कारण पेशीच्या वाढ, विकास इत्यादी क्रियांच्या नियंत्रणासाठी आवश्यक असणारे केंद्रक एडस्‌च्या विषाणूमध्ये नसते.

(१४) एडस्‌ग्रस्त व्यक्तिशी हस्तांदोलन केल्यामुळे एडस्‌चा संसर्ग होऊ शकतो काय ?

एडस्‌ग्रस्त व्यक्तिशी हस्तांदोलन केल्याने एडस्‌चा संसर्ग होऊ शकत नाही. कारण एडस्‌चा रोगजंतू सजिव व्यक्तिच्या रक्ताशिवाय इतरत्र जिवंत राहु शकत नसल्यामुळे घामामध्ये त्याचे अस्तित्व नसते.

(१५) सलुनमध्ये सामायिक ब्लेड वापरल्याने एडस्‌ संसर्ग होतो काय ?

सलुनमध्ये दाढी करताना रक्त शरीराबाहेर येण्याची शक्यता असते. त्यामुळे एडस्‌ग्रस्त व्यक्तिच्या दाढीसाठी वापरलेले ब्लेड तत्काळ इतर व्यक्तिसाठी वापरले तर एडस्‌ संसर्ग होण्याची शक्यता असते.

(१६) असुरक्षित लैगिंक संबंधाशिवाय अन्य मार्गाने एडस्‌ संसर्ग होऊ शकतो काय ?

असुरक्षित लैगिंक संबंधाशिवाय एडस्‌ग्रस्त गर्भवती महीलेकडुन तिच्या अर्भकाला,एडस्‌ग्रस्त व्यक्तिच्या दुषीत रक्ताद्वारे त्याचबरोबर एडस्‌ग्रस्त व्यक्तिच्या अवयव रोपणामुळे एडस्‌ संसर्ग होतो.

(१७) प्रजननक्षमता प्राप्ती पूर्वीही एडस्चा संसर्ग होऊ शकतो काय ?

प्रजननक्षमता प्राप्ती पूर्वीही एडस्चा संसर्ग दुषीत रक्त संक्रमण, असुरक्षित लैगिंक संबंध, एडस्बाधित व्यक्तिने केलेले अवयवदान, मादक द्रव्य सेवनासाठी सामायिक सुईचा वापर इ. मुळे होतो.

(१८) एडस्ग्रस्त महिलेकडुन तिच्या अर्भकाला एडस् संसर्ग होऊ शकतो काय ?

एडस्ग्रस्त महिलेकडुन तिच्या अर्भकाला एडस्चा ससर्ग होतो. परंतु सध्या उपलब्ध झालेल्या काही औषधोपचारामुळे (निव्हारिपीन) अर्भकाला होणारा एडस् संसर्ग काही प्रमाणात कमी करता येतो.

(१९) एड्स्ग्रस्त मातेकडून स्तनपानाद्वारे एडस् संसर्ग होऊ शकतो काय ?

एडस्ग्रस्त महिलेस जन्मलेल्या बालकास मातेकडुन एडस् संसर्ग झालेला असतो. प्रसुतिदरम्यान महिलेस एच आय व्ही संसर्ग झाला तरी बालकास स्तनपानाद्वारे एडस् संसर्ग होत नाही.

(२०) लैगिंक संबंधा दरम्यान निरोध वापरल्याने एडस् संसर्ग टाळता येतो काय ?

लैगिंक संबंधा दरम्यान निरोध वापरल्याने एडस् संसर्ग टाळता येतो. हलक्या प्रतिचा निरोध शरीरसंबंधा दरम्यान फाटल्यामुळे संसर्ग होण्याची शक्यता असते.

(२१) एडस् झालेल्या स्त्रीने गर्भधारणा होऊ द्यावी काय ?

एडस् झालेल्या स्त्रीने गर्भधारणा होऊ न देणे हे तिचे सामाजिक कर्तव्य आहे. परंतु सध्या उपलब्ध औषधोपचारामुळे अर्भकाचा एडस् संसर्ग काही प्रमाणात कमी करता येतो.

(२२) डास, माशी, ढेकुण इ. किटकाद्वारे एडस्चा प्रसार होतो काय ?

डास, माशी ,ढेकुण इ. किटकाद्वारे एडस्चा प्रसार होत नाही. कारण हे किटक रक्त शोषुन घेतात. त्याचबरोबर एडस्चा विषाणू संबंधित किटकांच्या शरीरात राहू, वाढू तसेच प्रजनन करु शकत नाहीत.

(२३) एडस्ग्रस्त व्यक्तिने रक्त, वीर्य, अवयव दान करावे काय ?

एडस्ग्रस्त व्यक्तिने वैयक्तिक व सामाजिक जबाबदारी व कर्तव्य पार पाडण्याच्या दृष्टीने रक्तदान अवयवदान, वीर्यदान करु नये, कारण त्याच्या रक्त आणि वीर्यामध्ये एडस्चे विषाणू असतात.

(२४) एडस्ग्रस्त व्यक्तिला इतरापासुन वेगळे ठेवल्याने एडस् बरा होता काय ?

एडस्ग्रस्त व्यक्तिला इतरापासुन वेगळे ठेवल्याने एडस् बरा होत नाही. परंतु एडस्ग्रस्त व्यक्तिची सेवा सुश्रुशा करणाऱ्या निरोगी व्यक्तिने पुरेशी काळजी घेणे आवश्यक आहे.

(२५) उपलब्ध औषधोपचारामुळे एडस्पासुन पूर्ण मुक्ती शक्य आहे काय ?

उपलब्ध औषधोपचारामुळे एडस्पासुन पूर्ण मुक्ती आज तरी शक्य नाही. औषधोपचारामुळे एडस् विषाणूची प्रजनन क्षमता कमी केली जाते. त्यामुळे आजचा मृत्यु उद्यापर्यत पुढे ढकलला जातो.